



सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १७१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



## मालेगाव स्फोटप्रकरणात मोहन भागवतांना अटक करण्याचे होते आदेश; माजी एटीएस अधिकाऱ्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१,मालेगाव**

सप्टेंबर २००८ साली मध्ये मालेगाव येथे बॉम्बस्फोट झाला होता. त्यानंतर काल (गुरूवार) एनआयएच्या विशेष न्यायालयाने तब्बल १७ वर्षांनंतर या प्रकरणात मोठा निकाल दिला. मुख्य आरोपी साध्वी प्रज्ञा आणि कर्नल पुरोहितसह सर्व ७ही आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. याच निकालानंतर आता एटीएसच्या एका माजी अधिकाऱ्याने मोठा गौप्यस्फोट केला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालवक मोहन भागवत यांना पकडून आणण्याचे आदेश आपल्याला मिळाले होते, असा खुलासा या माजी अधिकाऱ्याने केला आहे.

एटीएसच्या या माजी पोलिस अधिकाऱ्याने केलेल्या दाव्यानुसार, आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांना अटक करण्यास सांगण्यात आले होते. निवृत्त निरीक्षक मेहबूब मुजावर म्हणाले, भगवा दहशतवादाचा सिद्धांत खोटा होता, मला मोहन भागवतांना अडकवण्याचे आदेश देण्यात आले होते. मोहन भागवत यांना अटक करण्यास सांगण्यात आले, जेणेकरून हा स्फोट भगवा दहशतवाद आहे हे सिद्ध होईल, असे ते म्हणाले.

माजी अधिकारी मेहबूब मुजावर म्हणाले, 'भगवा दहशतवाद' सिद्ध करण्यासाठी मला या प्रकरणात समाविष्ट करण्यात आले होते. मला संघाचे प्रमुख मोहन भागवत यांना गुंतवण्याचे थेट निर्देश देण्यात आले होते आणि हे आदेश तत्कालीन मालेगाव



स्फोटाचे मुख्य तपास अधिकारी परमबीर सिंग आणि त्यांच्या वरिष्ठांनी दिले होते असा दावाही त्यांनी केला. मोहन भागवत आणि इतर निष्पाप लोकांना या प्रकरणात अडकवणे, हा सरकार आणि एजन्सींचा उद्देश होता. भगवा दहशतवादाची संपूर्ण संकल्पनाच खोटी होती. असेही ते म्हणाले.

मुजावर म्हणाले की त्यांनीही ते आदेश पाळले नाहीत कारण ते (आदेश) भयानक होते आणि त्यांना त्या आदेशांचे परिणाम माहित होते. मोहन भागवत यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वाला पकडणे माझ्या क्षमतेबाहेर होतं. मी आदेशांचं पालन केलं नाही, म्हणूनच माझ्यावर खोटा खटला दाखल करण्यात आला आणि त्यामुळे माझी ४० वर्षांची कारकीर्द उद्धवस्त झाली असा आरोपही त्यांनी केला.मोहन भागवत यांना पकडलं नाही म्हणून माझ्यावर खोटा खटला दाखल केला. त्यातून माझ्या करिअरचे ४० वर्ष उद्धवस्त झाले असंही मेहबूब मुजावर यांनी दावा केला आहे.दरम्यान, मालेगाव स्फोटातील आरोपी निर्दोष सुटले त्याचा आनंद आहे. त्यात माझेही छोटे योगदान होते. कोर्टाच्या या निर्णयाने एटीएसमध्ये होणारी चुकीची कामे फेटाळली आहेत असंही निवृत्त पोलीस अधिकारी मेहबूब मुजावर यांनी म्हटलं आहे. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास याआधी एटीएसच्या हाती होता. त्यानंतर कालांतराने तो राष्ट्रीय तपास यंत्रणांकडे सोपवण्यात आला होता. मुजावर हे २९ सप्टेंबर २००८ साली झालेल्या मालेगाव स्फोटाचा तपास करणाऱ्या एटीएसचा भाग होते. एटीएसने तेव्हा काय तपास केला, का केला हे मी सांगू शकत नाही परंतु मला राम कलसांगरा, संदीप डांगे, दिलीप पाटीदार आणि आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांच्यासारख्या लोकांबद्दल गोपनीय आदेश दिले होते. हे सर्व भयानक असल्याचे मेहबूब मुजावर म्हणालेत.

## उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

### ९ सप्टेंबरला होणार मतदान, निवडणूक आयोगाची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नवी दिल्ली**

संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच जगदीप धनखड यांनी प्रकृतीचं कारण देत उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झालं आहे. दरम्यान, नव्या उपराष्ट्रपतींची निवड करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आय़ोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार आता ९ सप्टेंबर रोजी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ७ ऑगस्ट रोजी या निवडणुकीसाठी अधिसूचना जाहीर होणार आहे. तर २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठीची शेवटची तारीख २५ ऑगस्ट असेल.

९ सप्टेंबर रोजी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मतदान होणार असून, सकाळी १० ते संध्याकाळी ५ ही मतदानाची वेळ असेल. तसेच मतदान आटोपल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी मतमोजणी होणार आहे.




उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी लोकसभा आणि राज्यसभा या संसदेतील दोन्ही सभागृहातील सदस्य हे मतदार असतात. सद्यस्थितीत दोन्ही सभागृहांमध्ये भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएकडे बहुमत आहे. त्यामुळे ही निवडणूक सत्ताधारी एनडीएसाठी फारशी अवघड जाण्याची शक्यता कमी आहे. अशा परिस्थितीत आता सत्ताधारी भाजपाकडून उपराष्ट्रपतीपदासाठी कुणाला उमेदवारी दिली जाते हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

## माजी पंतप्रधान देवेगौडांचा नातू प्रज्ज्वल रेवण्णा अत्याचार प्रकरणात दोषी, उद्या शिक्षेची घोषणा




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१बंगलेरू**

कर्नाटकउच्च न्यायालयाने जनता दल (एस)चे माजी खासदार प्रज्वल रेवण्णाला बलात्कार आणि लैंगिक छळाच्या प्रकरणात मोठा धक्का दिला. न्यायालयाने या प्रकरणात रेवण्णाला दोषी ठरवले. न्यायालयाने दोषी ठरवल्याचा निर्णय देताच, रेवण्णा न्यायालयातच ढसाढसा रडू लागल्याचे सांगितले जाते. माजी खासदार प्रज्ज्वल रेवण्णाला सेक्स टेप प्रकरणात दोषी ठरवण्यात आले आहे. न्यायालयाकडून उद्या त्याला शिक्षा जाहीर केली जाणार आहे. प्रज्ज्वल रेवण्णा हा देशाचे माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू आहे.

प्रज्ज्वल रेवण्णावर लैंगिक छळाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. याशिवाय त्याच्यावर अनेक महिलांवर बलात्कार केल्याचाही आरोप आहे. प्रज्ज्वल रेवण्णा याच्यावरील आरोपांमुळे जेडीएसने त्याला पक्षातून निलंबितही केले होते.

**प्रज्वल रेवन्ना कोण आहे?**

प्रज्वल रेवण्णा हा माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू आहे. प्रज्वलचे आजोबा पंतप्रधान, काका मुख्यमंत्री आणि वडील मंत्री होते. १० वर्षे जेडीएसमधून राजकारण करताना रेवण्णाने २०१९ मध्ये हसन मधून लोकसभा निवडणूकही जिंकली. मात्र, २०२४च्या निवडणुकीत त्याला पराभवाचा सामना करावा लागला.

## 'निवृत्त व्हा, कुठेही जा...तुम्हाला सोडणार नाही' राहुल गांधींचा थेट इशारा; कुणावर संतापले?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नवी दिल्ली**

मागील काही काळापासून विरोधक सातत्याने निवडणूक आयोगावर भाजपसाठी काम केल्याचा आरोप करत आहेत. बिहारमधील मतदार यादीवरुन तर बराच गदारोळ सुरू आहे. अशातच, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी(दि.१) निवडणूक आयोगावर मोठा आरोप केला. 'मतं चोरीला जात आहेत. आमच्याकडे याचे ठोस पुरावे आहेत. मी गांभीर्याने बोलतोय,



निवडणूक आयोगच या मतचोरीत सहभागी आहे. आयोग हे भाजपसाठी करत आहे,' असा आरोप राहुल गांधी यांनी केला.

संसद भवन परिसरात मीडियाशी बोलताना राहुल गांधी म्हणाले, 'आम्हाला मध्य प्रदेशात शंका होती. लोकसभा निवडणुकीतही शंका होती. महाराष्ट्रातील निवडणुकीदरम्यान आमची शंका आणखी वाढली. आम्हाला संशय होता की, राज्य पातळीवर एक कोटी मतदार जोडले गेले आहेत. आम्ही तपशीलात गेलो, मात्र निवडणूक आयोगाने मदत केली नाही. आम्ही स्वतःहून चौकशी केली. त्याला सहा महिने लागले. पण आम्हाला जे सापडले आहे, ते अणुबॉम्बसारखे आहे. हे जर फुटले, तर तुम्हाला भारतात कुठेही निवडणूक आयोग दिसणार नाही.

मते चोरीला जात आहेत. आमच्याकडे आता याचे ठोस पुरावे आहेत. निवडणूक आयोगही यात सहभागी आहे. मी हे अगदी गंभीरपणे सांगतोय, निवडणूक आयोगातील जो कोणी हे काम करत आहे. वरपासून खालपर्यंत...आम्ही तुम्हाला सोडणार नाही. तुम्ही भारताविरुद्ध काम करत आहात, हा देशद्रोह आहे. तुम्ही कुठेही असाल, निवृत्त व्हा, कुठेही जा...आम्ही तुम्हाला शोधून काढू,' असा इशाराही राहुल गांधी यांनी यावेळी दिला.

## पुण्याचे दुसरे दादा जे कधीही दादागिरी करत नाहीत

### देवेंद्र फडणवीस यांच्याकडून चंद्रकांतदादांची पाठराखण



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१पुणे**

पुण्यातील टिळक स्मारक मंदिर येथे टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने देण्यात येणारा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार केंद्रीय नितीन गडकरी यांना प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यामंत्री एकनाथ शिंदे. मंत्री चंद्रकांत पाटील, मुरलीधर मोहोळ आणि भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

अजित पवारांनीपुणेकर अजूनही तुम्हाला पुण्याचे समजत नाहीत. ते तुम्हाला कोल्हापूरचेच समजतात. अशा प्रकारे चिमटा काढला होता. त्यानंतर आता फडणवीस यांनी चंद्रकांत पाटील यांची पाठराखण केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना फडणवीस यांनी पुरस्कार प्रदान केल्यानंतर आपल्या भाषणात चंद्रकांत पाटील यांचे नाव घेत मिश्किल विनोद केला आहे. भाषण सुरू झाल्यावर त्यांनी नितीन गडकरी यांच्या पुरस्काराचे कौतुक केले. ते म्हणाले, ज्यांनी महाराष्ट्र देशाला नवीन स्वरूप दिलं. असे लाडके नेते नितीनजी गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पुण्याचे दुसरे दादा जे कधीही दादागिरी करत नाहीत असे चंद्रकांत दादा असं म्हणताच सभागृहात हास्यकल्लोळ झाला. काही लोक दादागिरी करत नाहीत. पण त्यांचं व्यक्तिमत्वचं तस असतं असं म्हणत दादांचे कौतुक केले. त्यानिमित्ताने या पुरस्कार सोहळ्यात राजकीय विनोदही ऐकायला मिळाल्याची चर्चा होती. अजित पवारांनीपुणेकर अजूनही तुम्हाला पुण्याचे समजत नाहीत. ते तुम्हाला कोल्हापूरचेच समजतात. अशा प्रकारे चिमटा काढला होता. त्यानंतर आता फडणवीस यांनी चंद्रकांत पाटील यांची पाठराखण केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना फडणवीस यांनी पुरस्कार प्रदान केल्यानंतर आपल्या भाषणात चंद्रकांत पाटील यांचे नाव घेत मिश्किल विनोद केला आहे. भाषण सुरू झाल्यावर त्यांनी नितीन गडकरी यांच्या पुरस्काराचे कौतुक केले. ते म्हणाले, ज्यांनी महाराष्ट्र देशाला नवीन स्वरूप दिलं. असे लाडके नेते नितीनजी गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पुण्याचे दुसरे दादा जे कधीही दादागिरी करत नाहीत असे चंद्रकांत दादा असं म्हणताच सभागृहात हास्यकल्लोळ झाला. काही लोक दादागिरी करत नाहीत. पण त्यांचं व्यक्तिमत्वचं तस असतं असं म्हणत दादांचे कौतुक केले. त्यानिमित्ताने या पुरस्कार सोहळ्यात राजकीय विनोदही ऐकायला मिळाल्याची चर्चा होती.

## हिंदू दहशतवादाची थिअरी बनवली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची काँग्रेसवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नागपूर**

२००८ सालच षडयंत्र आता सर्वांसमोर उघड झालय. त्यावेळच्या युपीए सरकारने मतांच्या राजकारणासाठी हिंदू टेरर, भगवा दहशतवाद हे शब्द तयार केले. हिंदू दहशतवादाची थिअरी बनवली, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केली.



वारंगा येथे कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कार्यक्रमानंतर पत्रकारांनी त्यांना मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात माजी एटीएस अधिकाऱ्याच्या वक्तव्याबाबत विचारले असता मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, १९९० च्या दशकाच्या शेवटच्या भागात आणि साधारणत: २००० च्या सुरुवातीला संपूर्ण विश्वात मोठ्या प्रमाणात दहशतवादी घटना घडल्या. अमेरिका, युरोपमध्ये दहशतवादाच्या घटना घडल्या. भारतात तर घडतच होत्या. यातल्या अनेक घटनांचे धागेदोरे पाकिस्तानपर्यंत होते. त्यातून इस्लामिक टेररिजमच नरेटिव तयार झालं. ते भारताने तयार केलं नव्हतं भारतात या नरेटिवचा आपल्या वोटबँकेवर परिणाम होतोय हे काँग्रेसच्या लक्षात आलं. कोणीच सर्व मुस्लिमांना दहशतवादी ठरवलं नव्हतं. पण तरीदेखील या ठिकाणी सर्व हिंदूंना दहशतवादी ठरवण्याचं यूपीएने षडयंत्र रचलं. हिंदू दहशतवाद हा शब्द तयार केला. आम्हाला मतदान करणारे जे लोक आहेत, त्यांच्या मनात राग निर्माण होऊ नये किंवा त्यांना वाटावं आम्ही बॅलन्स करतोय, यासाठी हिंदू दहशतवादाची थिअरी बनवण्यात आली. लोकांना अटक केली. हिंदुत्ववादी संघटना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अधिकारी, पदाधिकारी यांना टार्गेट करण्याचं हे षडयंत्र होतं. त्यासाठी भरपूर प्रयत्न करण्यात आले. परंतु अधिकाऱ्यांना ठोस पुरावे मिळाले नाही. अनेक अधिकारी असे होते, ज्यांच्यावर भरपूर दबाव टाकण्यात आला. त्यांनी सुद्धा सांगितलं आम्ही असं बेकायद काम करणार नाही. हे षडयंत्र हळूहळू बाहेर येत असल्याचेही ते म्हणाले.

## गोविंदा आला रे...! सरकार संरक्षण देणार; राज्यातील १.५० लाख गोविंदांचा विमा काढणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**

गोकुळाष्टमीली दहिहंडीला १०-१२ पेक्षाही जास्त मानवी थर लावले जातात. यावेळी पडून अनेक गोविंदा जखमी होतात, जायबंदी होतात. त्यांच्यावर उपचार करण्यासाठी पैसे देखील खुप लागतात. राज्य सरकारने हा खर्च उचलला आहे. राज्यातील दीड लाख गोविंदांचा विमा उतरविण्यात येणार आहे. गोविंदांचा विमा काढण्यासाठी प्रत्येक गोविंदामागे द ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने ७५/- दराने विमा संरक्षण देण्याचे मान्य केले आहे. यानुसार महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन, अंधेरी (पूर्व) या संस्थेशी समन्वय साधून विमा उतरविणे आणि विम्याचा कालावधी ठरविण्यासाठी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. क्रीडा विकास निधीतून



रु.१,१२,५०,००० निधी देण्यात येणार आहे. यानुसार तातडीने विमा उतरविण्याचे आदेश देण्यात आले. गेल्या वर्षी १.२५ लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्यात आले होते. मात्र, काही गोविंदा त्यापासून वंचित राहिले. यात आता आणखी २५ हजार गोविंदांची भर पडणार आहे.

## ट्रम्प टॅरिफबाबत सरसंघचालकांकडून सूचक विधान आत्मनिर्भरता व स्वबळावरच भारताची प्रगती शक्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नागपूर**

ट्रम्प टॅरिफमुळे जगातील अनेक देशांमध्ये नाराजीचा सूर असून भारताने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या या चालीमुळे शरणागती पत्करावी असा काही पाश्चिमात्य देशांचा प्रयत्न आहे. याबाबत भारताने अधिकृत भूमिका मांडलेली नसली तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी नागपुरात सूचक विधान केले आहे. आत्मनिर्भरता व स्वबळावरच भारताची प्रगती शक्य आहे. स्वबळातूनच भारताची जास्त प्रगती होऊ शकते असे त्यांनी प्रतिपादन केले.




कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या डॉ.हेडगेवार आंतरराष्ट्रीय गुरुकुलाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. परिस्थिती व देशाचे सूत्रसंचालक आपल्याला सांगत आहेत की भारताला आता आत्मनिर्भर व्हायला पाहिजे. आपल्या बळावरच आपली प्रगती होईल. सर्व प्रकारचे बळ वाढले पाहिजे. या सर्वांच्या पाठीमागे प्रत्येकाची अस्मिता असते. त्याच्या बळावरच विकास होऊ शकतो. जिथे स्वत्व असते तिथे बळ, ओज व लक्ष्मी यांचा निवास असतो. स्वत्व नसले तर बळदेखील नाहीसे होते. स्वनिर्भरता आली की बळ, ओज, लक्ष्मी आपोआपच येतात. भारताची परंपरा फार प्राचीन आहे. पाश्चात्यांच्या इतिहास गृहित धरला तरी इसवी सन एकपासून सोळाशेपर्यंत भारत सर्वांच्या अग्रेसर होता. आपण आपल्या स्वत्वावर पक्के होते. त्याचे विस्मरण सुरू झाले तेव्हापासून आपली घसरण सुरू झाली व आपण परकीय आक्रमकांचे भक्ष्य बनलो. इंग्रजांनी तर आपल्या बुद्धीलाही गुलाम करण्याची पद्धत विकसित केली.

## संपादकीय ......

# सडेतोड उत्तर......

'ऑपरेशन सिंदूर'ची मोहीम यशस्वीपणे पार पडल्यानंतर त्याबाबतची चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलवावे, अशी मागणी विरोधी पक्षांनी केली होती. खरे तर, या मोहिमेबद्दलची आवश्यक ती माहिती संरक्षण व परराष्ट्र खात्याच्या प्रवक्त्यांनी त्याचवेळी दिली होती. मात्र, संघर्ष सुरू असतानाच प्रश्न उपस्थित करण्याची भूमिका विरोधी पक्षांच्या काही नेत्यांनी घेतली. आता सोमवारी संसदेत ही चर्चा सुरू असतानाच, लष्कराच्या कमांडोंनी श्रीनगरबाहेर हाती घेतलेल्या 'ऑपरेशन महादेव'ला महत्त्वाचे यश मिळाले. त्यात पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार सुलेमान ऊर्फ आसिफ ठार झाला. जिब-ान आणि हमज़ा अफगाणी असे अन्य दहशतवादीही मारले गेले. कारवाई थांबली नसून, पाकिस्तानने आगळीक केल्यास ती पुन्हा राबवली जाईल, असा सुस्पष्ट इशारा संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सभागृहात चर्चेवेळी दिला.

'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान पाकिस्तानने भारताची किती लढाऊ विमाने पाडली, यासारखे प्रश्न विरोधकांनी विचारले. खरे तर भारताच्या हवाई दलाने पाकिस्तानची किती विमाने पाडली, असा प्रश्न विरोधकांनी सरकारला विचारायला हवा होता, अशी टीका राजनाथ सिंह यांनी केली. पहलगामनंतर काँग्रेससह अन्य पक्षांनी, आम्ही सर्व सरकारमागे आहोत, असे सांगितले होते; पण त्यानंतर मात्र सतत 'ऑपरेशन सिंदूर'च्या कारवाईबाबत शंकाच उपस्थित केल्या गेल्या. पाकिस्तानने सुरुवातीला दहशतवादी तळ नष्ट केल्याचे मान्य केले नव्हते. उलट भारताच्या नागरी-लष्करी तळांवर हल्ले करून शस्त्रसंधीचे उल्लंघन केले; पण या हल्ल्यांमुळे भारताचे कोणतेही नुकसान झाले नाही, अशी माहितीही सभागृहास मिळाली. भारताच्या मुत्सद्देगिरीमुळे संयुक्त राष्ट्रांच्या १९० सदस्यांपैकी केवळ तीन सदस्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'ला विरोध केला, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी लोकसभेत सांगितले. मात्र, भारतास जागतिकस्तरावर समर्थन मिळाले नसल्याचा सूर विरोधी पक्षांकडून आळवला जात होता. परराष्ट्रमंत्र्यांच्या उत्तरामुळे त्यांचे समाधान झाले असावे! पहलगाम हल्ल्याला शंभरहून अधिक दिवस झाले, तरी केंद्र सरकारला हल्लेखोर पकडता आलेले नाहीत.

जम्मू-काश्मीरच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी केंद्रीय गृहमंत्र्यांवर आहे. त्यांना नायब राज्यपालांच्या आड लपता येणार नाही, असे काँग्रेस खासदार गौरव गोगोईंनी भाषणात म्हटले होते. योगायोगाने गोगोईंचे भाषण ज्या दिवशी झाले, त्याच दिवशी पहलगाममधील दहशतवाद्यांचा खात्मा केल्याची बातमी आली. अर्थात, अद्यापही काही दहशतवादी आणि त्यांचे साथीदार पकडले गेलेले नाहीत, हे वास्तव आहे. पंडित नेहरूंच्या काळात संरक्षण दलांच्या मजबुतीकरणासाठी काहीच केले गेले नाही, अशा स्वरूपाची टीका भाजपचे खासदार तेजस्वी सूर्या यांनी केली, ती वस्तुस्थितीला धरून नव्हती. त्यांनी इतिहास वाचला पाहिजे, अशी चपराक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी लगावली.

पहलगाम हल्ल्यावेळी तेथे एकही सुरक्षा जवान तैनात का नव्हता, असा सवाल शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी केला. या चर्चेत मराठी खासदारांनी ठळक हजेरी नोंदवली. 'ऑपरेशन सिंदूर'ला 'तमाशा' संबोधण्याचे संतापजनक वक्तव्य काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेसने दहशतवादविरोधी 'पोटा' कायदा रद्द केल्यामुळे त्याचे परिणाम देशाला कसे भोगावे लागले, यावर बोट ठेवले. दहशतवादी पाकिस्तानमधून आले, याचा काय पुरावा आहे, असे माजी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदम्बरम यांनी म्हटले होते. त्याचाही समाचार शहा यांनी घेतला. बाटला हाऊसमध्ये दहशतवाद्यांना ठार केल्यानंतर सोनिया गांधी यांनी अश्रू ढाळले होते, या गोष्टीचे स्मरण देऊन शहांनी काँग्रेसला पेचात पकडले. प्रियांका गांधी यांच्या भाषणात भावनेचा ओलावा होता. २००८ मध्ये मुंबईवरील हल्ल्याची जबाबदारी स्वीकारून, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला होता, याची आठवण करून देऊन त्यांनी सरकारला खिंडीत पकडले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही आक्रमक भाषण करून, सरकारला खडे सवाल केले. राजनाथ सिंह यांनी भाषणात एकदाही चीनचा उल्लेख केला नाही. तसेच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात बोलण्याची हिंमत पंतप्रधानांनी केली नाही, अशी तिखट टीका राहुल यांनी केली. चीन व पाकिस्तान एकत्रितपणे हे युद्ध लढले आणि ही गोष्ट गंभीरपणे विचारात घेतली पाहिजे, हा त्यांचा मुद्दा लक्षणीय होता. विरोधकांच्या टीकेचा सविस्तर परामर्श घेऊन, पंतप्रधानांनी सर्व प्रश्नांना चोख उत्तरे दिली. कोणत्याही जागतिक नेत्याने भारताला 'ऑपरेशन सिंदूर' थांबवण्यास सांगितले नाही, हे त्यांनी स्पष्ट करत त्यासंदर्भात सुरू असलेल्या चर्चेवर, तसेच आरोपांवर पुरेशी स्पष्टता दिली.

पाकिस्तान हल्ला करणार आहे, अशी माहिती अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षांनी दिली, तेव्हा त्यांनी हल्ला केल्यास तो त्यांना महागात पडेल, असा इशारा आपण दिल्याची माहितीही मोदी यांनी दिली. तसेच, पाकिस्तानने फोन करून भारताच्या 'डीजीएमओ'ला सांगितले की, तुम्ही खूप मारले, आता आणखी मार खाण्याची आमची ताकद नाही. तेव्हाच शस्त्रसंधी झाली, असेही त्यांनी स्पष्ट केले. याचा अर्थ, अमेरिकेच्या मध्यस्थीचा कोणताही प्रश्न नव्हता. पाकने गुडघे टेकल्यावरच 'ऑपरेशन सिंदूर' स्थगित केले गेले.

पाकिस्तानच्या अणुबॉम्बच्या धमक्यांना न घाबरता, भारताने पाकचे दहशतवादी अड्डे नष्ट केले. म्हणजेच अणुबॉम्बचे दबावतंत्र चालणार नाही, हे स्पष्ट केले. देशाच्या धोरणातील हा गुणात्मक फरक मोदी यांनी खास शैलीत समजावून सांगितला. १९६२ मधील चिनी आक्रमणाचे संकट जेव्हा देशासमोर घोंघावत होते, तेव्हा देश तुमच्या पाठीशी उभा आहे. चीनचे आक्रमण परतवून लावा, आम्ही पंतप्रधान नेहरूंचे हात बळकट करू पाहतो, असे उद्गार वाजपेयी यांनी काढले होते. या इतिहासापासून आजच्या राजकारण्यांनीही योग्य तो धडा घेतला पाहिजे. 'ऑपरेशन सिंदूर'बाबत तो घेतला गेला नाही. त्यावरच्या प्रश्नांना सरकारने सडेतोड उत्तर दिल्याने बरीच स्पष्टता आली, ते बरे झाले.

# हार्दिक शुभेच्छा!!!



प्रत्येकाच्या आयुष्यात काही लोक येतात जे आपल्या विचारांची छाप सोडून जातात. अश्या व्यक्तींना शब्दात मांडणे अशक्यच. कारण 'शब्दांच्या पलीकडले' असे ते असतात. अशाच एका अष्टपैलु व्यक्तीमत्वाचे नाव आहे मोहरील सर. होय, माझे गुरु ज्यांनी मला वर्गात बसून पुस्तकातील पाठ शिकवले नाही तर जीवनाच्या वेगवेगळ्या वळणावर येणारे अनुभवाचे पाठ शिकवले.

जीवन जगत असताना कडू-गोड सगळेच अनुभव आपण घेत असतो. पण प्रत्येक अनुभवातून काय शिकायचं, ठाम पणे कस उभं राहायचं, आणि प्रत्येक क्षणाला कस जगायचं हे सरांनी शिकवलं.कधी कधी आपल्या आयुष्यात असे काही प्रसंग येतात कि आपली अवस्था रनभूमीवरील अर्जुनागत होते. त्यावेळी योग्य दिशा, मार्ग दाखवायला एक तरी कृष्ण सारखा गुरु असावा लागतो. तो सगळ्यांनाच मिळतो असे नाही पण तो ज्याला मिळतो तो मात्र खूप भाग्यवान असतो. असे कृष्णा सारखे मारदर्शक गुरु मला मोहरील सरांच्या रूपाने मिळाले, खरंच मी खूप भाग्यवान आहे. सर फक्त एक शहर लांब गेलेत पण त्याच्या आठवणी, विचार, संस्कार कायम सोबत आहेत. त्यांनी दिलेला वसा पुढे नेणे यासारखे दुसरे भाग्य नाही.त्यांच्या एकाग्रतेचा, विचारशीलतेचा आणि सुसंवादाचा प्रभाव खोलवर रुजला आहे. आज मनात आनंद आहे, अभिमान आहे, पण थोडीशी खंत देखील आहे कि कुठेतरी ते सगळं ज्ञान सावटायला माझी ओंजळ छोटी पडली. आणि अशी आपल्याला घडवणारी व्यक्ती एका नव्या प्रवासाला निघते, तेव्हा मन थोडं भरून येतंच ना..आज त्यांच्या आयुष्यात एक नवी सुरुवात होत आहे. ते एका नामांकित महाविद्यालयात प्राचार्यपदी रुजू होत आहेत. हे आमच्यासारख्या सहकाऱ्यांसाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. त्यांचं ज्ञान, संयम, अनुभव आणि मार्गदर्शन नव्या पिढीसाठीही प्रकाशवाट ठरेल, यात शंका नाही.ज्या प्रकारे त्यांनी आमच्या महाविद्यालयात आदर्श प्राचार्य म्हणून कार्य केलं, तसंच पुण्यातील महाविद्यालयासाठीही ते प्रेरणास्रोत ठरतील. ज्या पद्धतीने त्यांनी आमच्या महाविद्यालयात शिस्त, स्वावलंबन आणि सहकार्याचं वातावरण निर्माण केलं, तेच संस्कार ते पुण्यातील महाविद्यालयातही रुजवतील.

सर, तुमच्या पुढील वाटचालीसाठी मी अंत:करणपूर्वक शुभेच्छा देते. तुमच्या ज्ञानाचं दीप असाच प्रज्वलित राहो. कित्येक विद्यार्थ्यांच्या मनात तुम्ही 'गुरू' म्हणून जे स्थान मिळवलं आहे, ते अजून अधिक सन्माननीय होवो, हीच प्रार्थना.

आज जे काही मी आहे, ते खूप अंशी तुमच्यामुळेच आहे...मनापासून आभार... आणि पुन:पुन्हा शुभेच्छा!

**– प्रा. शुभांगी जोशी,**
महिला महाविद्यालय, अमरावती.




## तोंडाच्या आरोग्यासाठी



**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक**

तोंडाच्या आरोग्यासाठी फक्त डॉक्टरकडे तपासणी एवढ्यावर समाधान न मानता समाजस्तरावर काही मूलभूत पावले उचलणे आवश्यक आहे. यामध्ये शाळांमध्ये नियमितपणे दात घासण्याचे उपक्रम राबविणे, मोफत टूथब्रश व टूथपेस्ट वाटप करणे, शिक्षक व पालक यांना या सवयींबाबत जागरूक करणे या गोष्टींचा समावेश होतो. लहान वयात घडणार्या सवयी आयुष्यभर टिकतात. त्यामुळे शालेय पातळीवर अशा उपक्रमांची अत्यंत गरज आहे.

मौखिक आरोग्याच्या दृष्टीने तोंड धुण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या पाण्याच्या तपासण्या (माऊथरिन्स चाचणी) उपलब्ध करून देणे, पेरिओडोंटल आजार लवकर ओळखण्याची सोय करणे यासारख्या उपाययोजना राबविता येतील.

अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, साखरयुक्त पदार्थांवरील पोषणमूल्य व सूचनांबाबत स्पष्ट इशारे देणे, लहान मुलांना आकर्षित करणार्या जाहिरातींवर निर्बंध घालणे यासारख्या धोरणात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. कारण, लहान वयात घडणार्या सवयी आयुष्यभर टिकतात. साखरयुक्त पदार्थ फक्त दातांचे नुकसान करत नाहीत, तर दीर्घकाळ त्याचा परिणाम संपूर्ण शरीराच्या आरोग्यावर होतो.

# फवारणीच्या वेळी करू नका हलगर्जीपणा बनू शकतो जीवघेणा; कृषी विभागाचा महत्त्वाचा सल्ला

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

विषयुक्त कीटकनाशकांची फवारणी करताना शेतकऱ्यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. फवारणी करताना वाऱ्याच्या दिशेने करावी, शिवाय उपाशीपोटी फवारणी करू नये, अन्यथा विषबाधा होण्याची शक्यता आहे.

खरीप हंगामात तणनाशक व कीटकनाशक फवारणी करताना योग्य काळजी न घेतल्यास विषबाधेचा धोका संभवतो. यापूर्वी अशा घटना घडल्या असून, फवारणीदरम्यान दक्षता घेण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. अनेक भागांत पिकांवर तणनाशक, कीटकनाशक फवारणी करण्याची धामधूम सुरू झाली आहे.

कीटकनाशक फवारणी करताना योग्य ती काळजी न घेतल्यास विषबाधा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कीटकनाशक फवारणी करताना प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या, वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

तणनाशक फवारणीचा पंप कधीही कीटकनाशकाच्या फवारणीसाठी वापरू नये. कीटकनाशकाचा चुकूनही वास घेऊ नये. मिश्रण तयार करताना हातमोजे वापरावे व तोंडाला मास्क लावणे आवश्यक आहे.फवारणी करताना अंग झाकलेले असावे, पंपाचे कीटकनाशक अंगावर पडणार नाही. पाऊस येण्याआधी किंवा पावसानंतर लगेच फवारणी नोझल शरीरापासून दूर ठेवावे.फवारणीचे कपडे व वस्तू इतर कामासाठी वापरू नये, फवारणीच्या वेळी तंबाखू खाणे, धूम्रपान करणे टाळावे, फवारणीचे काम आठ तासांवर करू नये, फवारणी करतेवेळी अशक्तपणा व चक्कर येणे, त्वचेची जळजळ होणे, पाणी येणे, अंधूक दिसणे, तोंडातून लाळ येणे, तोंडाची आग होणे, असा त्रास असल्यास तत्काळ वैद्यकीय उपचार घ्यावेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




फवारणी करताना अशी घ्यावी काळजी

कीटकनाशकांचे मिश्रण लाकडी काडीने मिसळा. फवारणीवेळी हातमोजे, बूट, मास्क, चष्मा वापरा. औषध अंगावर उडाल्यास त्वरित धुवा. तार/टाचणीने नोझल स्वच्छ करा. फवारणीनंतर अंघोळ करा आणि कपडे धुवा.

फवारणी करताना काय करू नये ?

उपाशीपोटी फवारणी नको. वाऱ्याच्या विरुद्ध फवारणी टाळा. धूम्रपान, अन्नपदार्थ वापर टाळा. रिकामे डबे पाण्यासाठी वापरू नका. विना जोड्याने फवारणी टाळा.

विषबाधा झाल्यास काय कराल ?

तातडीने जवळच्या सरकारी दवाखान्यात जा. १०८ या टोल फ्री क्रमांकावर म्ब्युलन्ससाठी संपर्क साधावा, रुग्णाला शक्य तितक्या लवकर वैद्यकीय मदत मिळवून द्यावी. खरीप हंगामात कीटकनाशक फवारणी करताना खबरदारी आवश्यक आहे.

योग्य तंत्र, योग्य साहित्य आणि वैयक्तिक सुरक्षेची जाणीव ठेवावी, असे कृषी विभागाने सांगितले. उपाशीपोटी फवारणी करू नका, अन्यथा विषबाधेचा धोका असल्याचे कृषी विभागाने सांगितले.

लाल रंगाचा मार्क अत्यंत विषारी

लाल रंगांची खूण असल्यास - अत्यंत विषारी.

पिवळ्या रंगांची खूण असल्यास - मध्यम विषारी.

निळ्या रंगांची खूण असल्यास - कमी विषारी.

हिरव्या रंगांची खूण असल्यास- सौम्य विषारी.

# बामादेही शेतशिवारात शेतकऱ्यावर अस्वलाचा हल्ला

## तिन दिवसांत दुसरी घटनावन्यप्राण्यांचा संचार वाढल्याने शेतक-यांमध्ये दहशत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१चिखलदरा**

मेळघाटातील जंगलालगत असलेल्याबामादेही शिवारात बुद्ध बेठे या शेतकऱ्यावर अस्वलाने हल्ला केला. या घटनेत ते गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने प्रा. आ. केंद्र काटकुंभयेथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विशेष म्हणजे गेल्या तिन दिवसांतील ही दुसरी वन्यप्राण्याची हल्ल्याची घटना असून, यापूर्वी वाघाच्या हल्ल्यात एक शेतकरी जखमी झाला होता. त्यामुळे संपूर्ण मेलघाट भागात शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेती हंगाम सुरू झाल्याने शेतकरी आपापल्या शेतात मशागत, पेरणी आदी कामांसाठी जात आहेत. मात्र, वाघ, अस्वल, बिबट्यासारख्या वन्यप्राण्यांचा वाढता वावर त्यांना प्राणघातक ठरत आहे. जंगलालगतच्या गावांमध्ये वन्यप्राण्यांचे दर्शन आता नित्याचे झाले आहे.

वनविभागाकडून दुर्लक्ष ?

स्थानिक शेतकऱ्यांचा आरोप आहे की, वनविभाग केवळ टास्क फोर्स तयारआणि बोर्ड लावून जबाबदारी संपवतो. प्रत्यक्षात



झपाट्याने वाढणाऱ्या घटनांवर कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही.

# राज्यस्तरीय स्वच्छता स्पर्धेची तयारी : अंजनगाव सुर्जी बसस्थानकाचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अंजनगाव सुर्जी**

राज्यभरात बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियान स्पर्धा राज्य परिवहन महामंडळाने आयोजित केली आहे. या स्पर्धेमध्ये अंजनगावसुर्जी बसस्थानक परिसराचे दुसऱ्या टप्प्याचे स्वच्छतेबाबत सर्वेक्षण मंगळवारी (दि.२९) करण्यात आले आहे. महामंडळ अधिकाऱ्यांच्या पथकाने सर्व बाबी तपासून स्वच्छतेचे निरीक्षण करून मूल्यांकनाची नोंद केली.

प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीदवाक्य अंगिकारताना सुरक्षित प्रवासासह स्वच्छ व सुंदरतेची अनुभूती प्रवाशांना मिळावी, यासाठी येथील स्वच्छता रंगरंगोटी व निसर्ग चित्र व समाजहितकारक प्रबोधन चित्र बसस्थानकाच्या भिंतींवर रेखाटल्याने प्रसन्नता निर्माण झाली. तसेच स्वच्छतेबाबत बसस्थानकाची चर्चा होऊ लागली. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियान संपूर्ण राज्यात सुरू केले आहे.

त्यामुळे बस स्थानकावरील स्वच्छतागृहे, परिसरात स्वच्छ वातावरण, पिण्याचे स्वच्छ पाणी, बसण्याची स्वच्छ जागा स्पर्धेच्या माध्यमातून केली. या मूल्यांकन समितीमध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या चंद्रपूर विभागाच्या विभाग नियंत्रक स्मिता सुतवणे, चंद्रपूर विभागीय अभियंता ऋषिकेश होले, दर्यापूर आगाराचे सहाय्यक वाहतूक अधीक्षक अरविंद पोटदुखे यांचा सहभाग



होता. स्थानिक प्रतिनिधी म्हणून पत्रकार गजेंद्र मंडलिक, रवींद्र वानखडे, वाहतूक नियंत्रक दिवाकर सोनार, बसस्थानकाच्या पेंटिंगचे काम करणारे पेंटर सुरेश रनवीर, उमेश नीतनवरे यांची उपस्थिती होती.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शुक्रवार दि. १ ऑगस्ट २०२५ शहर/ग्रामिण


## १०० रुपयांचे सिमेंट ३०० ला विकायचे, फसवे रॅकेट उघडकीस

### ब्रँडेड बॅगांचा वापर करून ग्राहकांची फसवणूक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १अमरावती**

शहरापासून जवळच असलेल्या मासोद येथील एका गोदामात कालबाह्य झालेले सिमेंट नामांकित कंपनीच्या बॅगमध्ये भरून सर्वसामान्य ग्राहक व इतर कामांसाठी शहर व परिसरात विकण्यात येत होते. मासोद भागातील या कारखाना वजा गोदामावर गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने गुरुवारी सायंकाळी धाड टाकून हा गोरखधंदा उघड केला. यासह बडनेरा लगतच्या काटआमला व नवसारी भागातील गोदामावरही पोलिसांनी एकाचवेळी छापेमारी करून एकूण १२०० बॅग निकृष्ट सिमेंट जप्त केले आहे.

मासोद परिसरात असलेल्या गोदामात मागील चार ते पाच महिन्यांपासून हा गोरखधंदा सुरू होता. गुन्हे शाखेचे पीआय गोरखनाथ जाधव, एपीआय मनीष वाकोडे, एपीआय इम्रान नाईकवाडे यांनी पथकासह या गोदामावर धाड टाकली. त्यावेळी मोठ्या प्रमाणात सिमेंटच्या बॅग या गोदामात भरलेल्या होत्या. हे गोदाम शाहरुख हसनेवाले आणि अफझल कालीवाले या दोघांचे असल्याचे पोलिसांनी सांगितले. शहरात व आजूबाजूला काही नामांकित कंपन्यांचे सिमेंट गोदाम आहे. या गोदामात कालबाह्य झालेले, पाणी किंवा ओलाव्यामुळे दगड बनलेल्या सिमेंटच्या बॅग मोठ्या प्रमाणात असतात. या बॅग हे दोघे १०० रुपये किंवा त्यापेक्षाही कमी दराने खरेदी करायचे. या निकृष्ट दर्जाच्या सिमेंटला नामांकित कंपनीच्या रिकाम्या बॅगमध्ये रिपॅकिंग करायचे, त्यामध्ये दगड झालेले सिमेंट असल्यास ते बारीक करायचे, मशीनद्वारे गाळून पुन्हा पॅकिंग करायचे. या नवीन बॅगमध्ये भरलेल्या सिमेंटची २५० रुपये बॅगप्रमाणे होलसेल मध्ये विक्री करायची. त्यानंतर हे निकृष्ट सिमेंटही नामांकित कंपनीच्या सिमेंट प्रमाणे बाजारात ३०० ते ३५० रुपये प्रतिबॅग दराने विक्री करण्याचा हा गोरखधंदा शहरात सुरू होता. पोलिसांना मासोद येथील गोदामातून जवळपास ७०० बॅग निकृष्ट दर्जाचे सिमेंट जप्त केले आहे.

#### फ्रेजरपुरा पोलिसांत गुन्हा

नामांकित कंपनीच्या गोदामातून प्रति बॅग शंभर रुपये किंवा त्यापेक्षा कमी दराने कालबाह्य सिमेंटची खरेदी करायचे. त्यानंतर गोदामात त्याच निकृष्ट सिमेंटला नामांकित कंपनीच्या बॅगमध्ये रिपॅकिंग करून ही सिमेंट बाजारात २५० ते ३०० रुपये प्रतिबॅग प्रमाणे विकत असल्याचे तपासात समोर आले. तिन्ही धाडी प्रकरणात फ्रेजरपुरा ठाण्यात गुन्हा दाखल करू. -गोरखनाथ जाधव, पीआय, गुन्हे शाखा युनिट १.

## विनाखंडीत वीज पुरवठ्यासाठी उपकेंद्रांचा कणा ठरतो

### महावितरणचे सीएमडी लोकेश चंद्र



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती-**

ग्राहकांना दर्जेदार, सुरक्षित आणि अखंडित वीज पुरवठा देण्यात ३३ केव्ही उपकेंद्रांची भूमिका अत्यंत मोलाची आहे. महावितरणच्या ३३ केव्ही लोणी (टाकळी) उपकेंद्रात सक्षमीकरण आणि नूतनीकरणाचे कार्य पार पाडले आहे. त्यामुळेच या उपकेंद्राला आएसओ मानांकन मिळवता आले, असे प्रतिपादन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

जिल्ह्यातील लोणी (टाकळी) येथील ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्राने आंतरराष्ट्रीय दर्जाचे मानांकन मिळाले आहे. परिमंडळातील पहिले आएसओ प्रमाणित उपकेंद्र होण्याचा मान मिळवला आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी उपकेंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी उत्कृष्ट कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत उपकेंद्राच्या रजिष्टरमध्ये अभिप्रायाची नोंद केली.

यावेळी उपकार्यकारी अभियंता जयंत घाटे आणि त्यांच्या संपूर्ण चमूचे कौतुक केले. ग्राहकांना वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी अभियंता, कर्मचारी रात्र - दिवस कार्यरत असतात. पावसाळ्यात वीज पुरवठा मोठ्या प्रमाणात खंडी होतो. मात्र कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे लवकर सुरळीत केला जातो.

व्यवस्थापकीय संचालकांच्या दौऱ्यात प्रादेशिक संचालक परेश भागवत, सौर कंपनीचे सल्लागार श्रीकांत जलतारे, मुख्य अभियंता अशोक साळुंके, अकोला येथील मुख्य अभियंता राजेश नाईक, अधीक्षक अभियंता प्रविण दरोली, कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे, राजेश घाटोळे, प्रदीप अंधारे आदींसह इतरही कर्मचाऱ्यांची या वेळी यांची उपस्थिती होती.

अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यायला हवा लोणी उपकेंद्राच्या प्रगतीत कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने घेतलेल्या सहभागाचे त्यांनी उल्लेख करत परिमंडळातील इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही क्षेत्रातील उपकेंद्रांना आएसओ मानकाच्या धर्तीवर सुधारित करावे व मानांकन मिळवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही लोकेश चंद्र यांनी यावेळी केले.

## शाश्वततेच्या वाटेवर महत्त्वपूर्ण पाऊल!

### अमरावती महापालिकेचा 'निसर्गदूत' व 'चेस गुरुकुल' उपक्रमांसाठी करार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अमरावती महानगरपालिकेने शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दोन अभिनव उपक्रम सुरू करत मोठा पाऊल उचलले आहे. 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत 'प्रकल्प निसर्गदूत' व स्वतंत्र बौद्धिक उपक्रम 'प्रकल्प चेस गुरुकुल' यांसाठी सामंजस्य करार (चेण) स्वाक्षरी समारंभ नुकताच महापालिकेच्या मुख्यालयात पार पडला. या उपक्रमांच्या प्रारंभावेळी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

या दोनही उपक्रमांचा लाभ अमरावती महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मिळणार असून, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता आणि बौद्धिक क्षमतांचा विकास घडवण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार आहे.प्रकल्प निसर्गदूत' या उपक्रमाअंतर्गत महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयक कार्यशाळा, वृक्षारोपण, कचरा व्यवस्थापन, जलसंवर्धन आणि हवामान बदल यांसारख्या मुद्द्यांवर आधारित उपक्रमात सहभागी करून घेतले जाईल.या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणसंवेदनशीलता वाढवून, त्यांना शाश्वत जीवनशैलीच्या दिशेने प्रवृत्त करणे हा आहे.दुसरा महत्त्वाचा उपक्रम म्हणजे 'प्रकल्प चेस गुरुकुल'. या उपक्रमाअंतर्गत महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये बुद्धिबळाचे प्रशिक्षण दिले जाणार असून, प्रशिक्षक विद्यार्थ्यांना विविध डावपेच शिकवतील. यामध्ये मार्गदर्शन शिबिरे व स्पर्धांचेही आयोजन करण्यात येईल.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, निर्णयक्षमता, एकाग्रता आणि संयम यांचा विकास होण्यास मदत होईल.या उपक्रमांबाबत बोलताना आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करताना त्यांचा निसर्गाशी संबंध आणि बौद्धिक क्षमता या दोन्हींचा समतोल राखणे आवश्यक आहे. हे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सजगता, आत्मभान आणि निर्णयक्षमता वाढवतील.त्यांनी पुढे सांगितले की, या दोन्ही उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शाळा, स्वयंसेवी संस्था, पालक आणि महानगरपालिका यांच्यात सुसंवाद आणि समन्वय राखणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक उपक्रमाचे मोजमाप, नियमित अहवाल, फीडबॅक आणि प्रगती मूल्यांकन हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. नवीन कल्पना आणि सूचना यांचे स्वागत करून उपक्रम अधिक प्रभावी करण्यासाठी प्रयत्न व्हावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.या समारंभास शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, प्रवदा फाउंडेशनचे संस्थापक अविरत देशपांडे, चेस गुरुकुल सविता चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव मंदार बक्षी, व्हिलींग फाउंडेशनचे संस्थापक उमंग मोंगा यांच्यासह संबंधित संस्थांचे अनेक पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

## महसूल दिनी एक लाख वृक्षारोपण होणार

### आजपासून महसूल सप्ताहाचे आयोजन; विविध कार्यक्रमांची रेलचेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती-** महसूल दिनाच्या निमित्ताने १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात वृक्षारोपण, दाखले वाटप आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महसूल दिनी एक लाख वृक्षारोपण करण्यात येणार आहे.महसूल दिनानिमित्त जिल्ह्यात वृक्ष लागवडीचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यात एक लाखाहून अधिक वृक्ष लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याला वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. यासाठी सामाजिक वनीकरण विभागाशी समन्वय साधून रोपांची उपलब्धता करून घेण्यात येणार आहे. यासोबतच स्वामित्व योजनेअंतर्गत पट्टेवाटपाचेही कार्यक्रम घेण्यात येणार आहे. तसेच नोंदणी विभागाकडून जुने दस्तावेज नागरिकांना वितरित करण्यात येणार आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अभियानांतर्गत पानंद रस्ते मोकळे करून या रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. तसेच महसूल तंटामुक्त गाव अभियान राबविण्यात येणार आहे. धारणी तालुक्यात सुमारे अडीच हजार जात प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. तसेच थेट



लाभाच्या योजना, आधार अपडेट, रेती पास वाटप आदी उपक्रमही राबविण्यात येणार आहे.महसूल सप्ताहात १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करण्यात येणार आहे. तसेच महसूल सप्ताहाचा शुभारंभ होईल. या दिवशी महसूल संवर्गातील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यात उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी यांना पुरस्कार वितरण आणि मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. २ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमित जागेचे पट्टे वाटप कार्यक्रम करण्यात घेण्यात येणार आहे. ३ ऑगस्ट रोजी पाणंद व शिवारांची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात येतील. ४ ऑगस्ट रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' प्रत्येक मंडळनिहाय राबविण्यात येईल.५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील ज्या लाभार्थ्यांना डीबीटी झालेली नाही, त्यांना घरभेटी देऊन डीबीटी करून अनुदानाचे वाटप करण्यात येईल. ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करून ती अतिक्रमणमुक्त करण्याचे धोरण ठरविण्यात येईल.

तसेच शर्तभंग झालेली जमीन शासनाकडे जमा करण्याचा निर्णय घेतला जाईल. ७ ऑगस्ट रोजी एम सँड धोरणाची अंमलबजावणी आणि नवीन मानक कार्यप्रणालीनुसार धोरण पूर्णत्वास नेण्यात येईल. याच दिवशी महसूल सप्ताहाचा सांगता समारंभ होणार आहे.

## भ्रष्टाचाराचा डाव फसला - लाचखोर अधिकारी एसीबीच्या तावडीत

### ५० हजारांची लाच घेताना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती-** येथील भूमी अभिलेख कार्यालयातील दोन अधिकाऱ्याऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिका-यांनी ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना अटक केली. या कारवाईमुळे भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. उपअधीक्षक अनिल पांडुरंग नेमाडे (वय ५५) आणि नगर परिक्षण अधिकारी चंद्रशेखर पुंडलीकराव गोळे (क्य ४३) अशी अटक अधिकाऱ्यांची नावे आहेत. भूमापक तक्रारदाराच्या मुलाचे कॅम्प परिसरातील नवजीवन कॉलनीमध्ये घर आहे. परंतु मुलगा विदेशात राहत असल्यामुळे त्याने तक्रारदार बडीलाच्या नावाने मुख्त्यारपत्र करून दिले होते. तक्रारदाराने घराच्या नावात फेरफार करण्याबाबत भूमी अभिलेख कार्यालय येथे अपिल दाखल केली निकाल होती. याप्रकरणात तक्रारदाराच्या बाजुने बातमी ठठ लागल्यामुळे पुर्वीचा फेरफार रद्द करून नवीन फेरफार करून देण्यासाठी नगर परिक्षण भूमापक अधिकारी चंद्रशेखर गोळे यांनी १ लाख २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तडजोडीअंती ५० हजार रुपयांची लाच देण्याचे निश्चित झाले होते. दरम्यान तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रितसर तक्रार दिली आणि ३० जुलै रोजी पडताळणीकारवाईदरम्यान



तक्रारदाराने ५० हजार रुपये आरोपीला दिले, तेव्हाच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी चंद्रशेखर गोळेला अटक केली.तसेच त्याची कसून चौकशी केली असता उपअधीक्षक अनिल दिल्याचे निष्पन्न होताच नेमाडे यांनी लाच घेण्यास प्रोत्साहन पाहण्यासाठी डलरप करा अटक त्यांनासुध्दा केली. याकारवाईत लाचलुचपत प्रतिबंधक विभागात्ते पोलीस अधीक्षक मारुती जगताप याच्या मार्गदर्शनात पोलीस उपअधीक्षक सुनील किनगे, पोलीस निरीक्षक योगीता ठाकरे, ज्ञानोबा फड, पोलीस अंमलदार युवराज राठोड, आशिष जांभोळे, वैभव जायले, उपेंद्र थोरात, विनोद धुळे यांचा समावेश होता.

## आव्हानात्मक परिस्थितीतही विद्यापीठासाठी कर्मचारी कुटुंबियांसारखे राबतात - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

### विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचा-यांना सन्मानपूर्वक निरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती-** कर्मचारी सेवानिवृत्त होत असतांना त्यांच्या कार्याचा सत्कार करणे हे माझे महत्वाचे कार्य मी समजतो. विद्यापीठाचा आज जो देशभरात नावलौकीक आहे, तो कर्मचा-यांमुळेच. आव्हानात्मक परिस्थितीतही विद्यापीठातील कर्मचारी आपल्या कुटुंबासारखे येथे राबतात. यापुढेही असेच कार्य करीत राहावे, जेणेकरुन विद्यापीठाचा नावलौकीक आणखी वाढेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळयात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून सांख्यिकीशास्त्र विभागप्रमुख तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. राजेश सिंह, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव अनिल काळबांडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती श्री गजानन पंचवटे, सौ. पंचवटे, श्री प्रकाश शिंदे, सौ. शिंदे, श्री अशोक राऊत, सौ. राऊत, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, सत्कारमूर्तींच्या प्रेमापोटी आज



सभागृह तुडूंब भरले आहे. श्रृतलेखनाचे विविध सभांचे इतिवृत्त अचुकपणे तयार करण्याचे अतिशय महत्वाचं काम श्री गजानन पंचवटे यांनी पार पाडले आहे. परीक्षा विभागाचे कठीण कार्य कर्मचारी सुरळीतपणे पार पाडत आहेत, ही मोठी उपलब्धी आहे, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना पुढील आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी श्री गजानन पंचवटे, श्री प्रकाश शिंदे व श्री अशोक राऊत यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, तर सौ. पंचवटे यांचा सहा. कुलसचिव सौ. साक्षी ठाकुर, सौ. शिंदे व सौ. राऊत यांचा उपकुलसचिव सौ. मोनाली तोटे पाटील यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. राजेश सिंह म्हणाले, विद्यापीठाचे कर्मचारी कुटुंबाप्रमाणे आणि निष्ठेने कामे करतात. एका लहानशा रोपटएाचे वटवृक्षामध्ये रुपांतर करण्यात कर्मचा-यांचा मोठा वाटा आहे. संस्था चालवायला ज्या बाबी लागतात, त्या विद्यापीठाच्या कर्मचा-यांमध्ये आहेत, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या शुभकामना दिल्या.

यावेळी सत्कारमूर्ती श्री गजानन पंचवटे, श्री प्रकाश शिंदे व श्री अशोक राऊत यांनी आपल्या सेवा काळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा-यांकडून मिळालेले प्रेम, स्नेहभाव व सहकार्यामुळेच आम्हाला चांगली सेवा विद्यापीठाला देता आली. त्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तर नियंत्रण अधिकारी श्री मंगेश वरखेडे, श्री अनिल काळबांडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले व मानद सचिव श्री श्रीकांत तायडे यांनी सत्कारमूर्ती श्री गजानन पंचवटे, श्री प्रकाश शिंदे व श्री अशोक राऊत यांचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक श्री धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला माजी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी तसेच विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणीचे सदस्य, विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

# अकोल्यात घंटागाडीसाठी घरमालकांकडून शुल्क वसुलीचा निर्णय

## द्यावा लागणार ५०रु प्रति माह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ अकोला-**

महापालिकेने शहरातील कचरा संकलनासाठी कंत्राटी पद्धतीने ठेका देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी तिसऱ्यांदा काढण्यात आलेल्या निविदेला प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया सुरु आहे. येत्या आठवडाभरात या निविदेला मान्यता मिळाल्यावर त्याचा कार्यारंभ आदेश निघाल्यानंतर साधारणत: येत्या आठवडाभरात शहरातील घनकचरा संकलनाचे काम कंत्राटदारामार्फत सुरु होणार आहे. त्यासाठी घरातील कचऱ्याच्या संकलनापोटी नागरिकांना ३० ऐवजी ५० रुपये दरमहा शुल्क द्यावे लागणार आहे.

शहरातील घनकचरा संकलनासाठी कंत्राट देण्यासाठी गेल्या महिन्यात दोन निविदा काढल्या होत्या. त्यातील एक निविदा अपूर्ण व अयोग्य आढळल्याने ती अपात्र ठरवण्यात आली. कचरा व्यवस्थापनासाठी तिसऱ्यांदा काढलेल्या निविदा प्रक्रियेत महापालिकेला दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. यामध्ये एक निविदा पात्र तर दुसरी अपात्र ठरल्याची माहिती आहे. पात्र संस्थेसोबत दराबाबत मनपाकडून चर्चा केली जाणार आहे. महापालिकेच्या दर संबंधित संस्थेला मान्य झाल्यास या निविदेला मंजुरी दिली जाऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली.

सध्या महापालिका प्रशासकांकडून प्राप्त निविदांमधील दरांचा आढावा घेतला जात आहे. दर ठरवणाऱ्या समितीच्या बैठकीत याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. घरोघर कचरा संकलनासाठी येणारे घंटागाडी चालक पूर्वी घर, दुकान असो वा कार्यालय प्रत्येकाकडून ३० रुपये महिना असे समान शुल्क आकारत असे. आता मात्र कंत्राटदार कचरा संकलन करणार असल्याने आता घरातील कचरा संकलनापोटी नागरिकांना दरमहा ५० रुपये तर व्यावसायिक प्रतिष्ठान, कार्यालये यांना दुप्पट म्हणजे दरमहा १०० रुपयांपर्यंत शुल्क आकारण्यात येणार आहे.




### निविदा अंतिम टप्प्यात

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील घनकचरा संकलित करण्यासाठी कंत्राटदार नियुक्तीसाठी तिसऱ्यांदा निविदा प्रक्रिया राबवण्यात आली असून, ही प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे. या निविदेला प्रशासकीय मान्यता मिळाली की, लवकरच महापालिका आयुक्त यांच्या आदेशानुसार यासंदर्भात कार्यवाही केली जाईल. –
संजय खोसे, आरोग्य विभाग प्रमुख, मनपा.

वाचणार सद्य:स्थितीत महापालिका स्वतः शहरातील कचरा गोळा करण्याचे काम करत आहे. कचरा संकलन करणाऱ्या १०० घंटागाड्या वरील स्वयंरोजगार तत्वावर काम करणारे मजूर एका घराच्या कचरा संकलनापोटी दरमहा ३० रुपये घेऊन ते सेवा देत आहेत. या कचरा संकलनातून महापालिकेला कुठलेही उत्पन्न मिळत नसून उलट वाहनांची देखभाल व दुरुस्ती तसेच इंधनावर लाखोंचा खर्च करावा लागत आहे. आयुक्तांनी शहरातील कचरा गोळा करण्याचे काम कंत्राटी पद्धतीने देण्याचा निर्णय घेतल्यानंतर या कामासाठी निविदा प्रक्रिया राबवली जात आहे. ती निविदा मंजूर झाली की कचरा संकलनावर होणारा लाखोंचा खर्च वाचणार आहे.कचरा संकलनात सुधारणा शहरातून दररोज मोठ्या प्रमाणात कचरा संकलित केला जातो.

सध्या महापालिकेकडून स्वत:च्या कर्मचाऱ्यांच्या व वाहनांच्या माध्यमातून कचरा व्यवस्थापना ची कामे सुरू आहेत. मात्र, दररोजचा निघणारा कचरा आणि अपुरे संख्याबळ पाहता कचरा संकलन व्यवस्थित होत नसल्याने त्याचे संकलन कंत्राटी पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला. थोडक्यात कंत्राटदारांची पेड सेवा राहणार असल्याने लोकांवर भार पडेल.

# महापालिकेने दिला महिला बचतगटांना कापडी पिशव्या तयार करण्याचा उद्योग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती-**

दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान आणि स्वच्छ भारत मिशन २.० या दोन महत्वाकांक्षी शासकीय उपक्रमांच्या प्रभावी समन्वयातून पर्यावरणपूरक व उद्यमशीलतेला चालना देणारे विविध उपक्रम अमरावती महानगरपालिका राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 'कापडी पिशवी वेंडिंग मशीन' स्थापनेचा अभिनव उपक्रम शहरातील सर्व प्रशासकीय झोनमध्ये प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात आला आहे.या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ प्लास्टिकचा वापर कमी होत नाही, तर महिला बचत गटांना उत्पन्नाच्या संधी उपलब्ध होत आहेत. जुन्या साड्याचा वापर करून तयार होणाऱ्या या कापडी पिशव्या केवळ पुनर्वापराचा आदर्श नाहीत, तर त्या एका स्वच्छ व जबाबदार समाजाच्या बांधिलकीचंही प्रतीक आहेत. या उपक्रमांतर्गत, जुन्या साड्या व कपड्यांपासून तयार केलेल्या सुंदर, टिकाऊ व पर्यावरणपूरक कापडी पिशव्य सध्या उत्कर्ष महिला बचत गट राजापेठ झोन, स्वराज महिला बचत गट- बडनेरा झोन, हिरकणी महिला बचतं गट- दस्तूरनगर झोन, सतगुरु महिला बचत गट- मुख्य कार्यालय या महिला बचत गटांमार्फत बनवण्यात येत आहेत. या पिशव्या ५. १० व २० रूपये या अत्यल्प दरात वेंडिंग मशीनच्या



माध्यमातून सहज उपलब्ध होतील. याशिवाय, बिझीलँड, सिटीलैंड आणि ड्रेमलैंड या ठिकाणी निघणाऱ्या निष्प्रयोजन कपड्यांचा पायदान, शोभेच्या वस्तू आणि हस्तकला वस्तूंमध्ये पुनर्वापर करण्याचे उपक्रमही लवकरच सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे एकीकडे कचऱ्याचे व्यवस्थापन होईल, तर दुसरीकडे महिला बचत गटांना अधिक रोजगार व उत्पन्न मिळेल.

हा उपक्रम म्हणजे महिला सक्षमीकरण, कचऱ्याचे पुनर्वापर व प्लास्टिकमुक्त अमरावतीच्या दिशेने एक ठोस आणि प्रेरणादायी पाऊल आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी केले.

# खेळातून घडले करिअर: कुंड सर्जापूरच्या ४० तरुणांना नोकऱ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अमरावती जिल्हा मुख्यालयाला लागून असलेल्या कुंड (सर्जापूर) गावाने खेळातून नोकरीपर्यंतचा प्रवास साध्य करणारे गाव अशी नवी ओळख निर्माण केली आहे. गेल्या तीन-चार वर्षांत या गावातील ४० तरुण-तरुणींना क्रीडा क्षेत्रातील कौशल्याच्या आधारे नोकऱ्या मिळाल्या आहेत.



गावकऱ्यांनी याचे संपूर्ण श्रेय तेथील चंद्रभान विद्यालयातील क्रीडा शिक्षक शरद गढिकर यांना दिले आहे. पूर्वी या गावात क्रीडा प्रकारांना नावे ठेवली जात होती. पालक विद्यार्थ्यांना अभ्यासात गुंतून राहण्यासाठी प्रोत्साहित करत होते.परंतु गढिकर यांनी हळूहळू हा समज बदलवून नागरिकांना आपलेसे केले. त्यामुळे विद्यार्थी शालेय अध्यापनासोबतच मैदानाकडेही जाऊ लागले. त्यातून कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, टेनिकाईट, बेसबॉल, सॉफ्टबॉल आदी खेळ तेथे रुजले.विद्यार्थ्यांनी या खेळांमध्ये नैपुण्य प्राप्त केले. त्यांनी जिल्हा, विभाग, राज्य स्पर्धांमध्ये वेगळा ठसा उमटवला. एकामागून एक प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना मिळू लागली. नोकरीच्या वेळी याच प्रमाणपत्रांच्या आधारे ५ टक्के राखीव कोट्यातून त्यांना नोकऱ्या मिळाल्या.

सध्या या गावातील तीन विद्यार्थी पीएसआय बनले आहेत. एका विद्यार्थिनीने सहायक लेखाधिकारी पद मिळवले आहे. याशिवाय पोलिस, सामाजिक वनिकरण, वनखाते आणि इतर विभागांमध्येही अनेकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत.पाचवी ते दहावीचे शिक्षण देणाऱ्या या शाळेची पटसंख्या १८० आहे. यातील बहुतेक विद्यार्थी दरवर्षी जिल्हास्तरापासून राज्यस्तरापर्यंत पोहोचतात. विशेष म्हणजे गेल्या १६ वर्षांपासून सॉफ्टबॉल खेळाचे जिल्ह्याचे अजिंक्यपद याच शाळेकडे आहे.कुंड सर्जापूर गावाची लोकसंख्या १,५०० असून साक्षरता ८० टक्क्यांहून अधिक आहे. जिल्हा मुख्यालयापासून १६ किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात एसटी बस, खाजगी वाहने आणि वलगाव रेल्वे स्टेशनवरून प्रवास करता येतो.या गावाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चंद्रभानजी विद्यालय हे श्रीराम मंदिर ट्रस्टतर्फे चालवले जाते. धार्मिक कार्यासाठी कटिबद्ध असलेला ट्रस्ट शाळा चालवतो, हे जिल्ह्यातील पहिले उदाहरण मानले जाते. रावसाहेब इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली या ट्रस्टची स्थापना करून प्रथम मंदिरात शाळा भरवली गेली. नंतर श्यामकांतजी बहाळे यांनी जागा उपलब्ध करून दिल्यानंतर शाळेची स्वतंत्र इमारत उभारण्यात आली.

# ब्राह्मणवाडा थडीच्या सरपंचाला मारहाण


## राजकीय दबावाचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१चांदूरबाजार**

चांदूरबाजार तालुक्यातील ब्राह्मणवाडा थडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पद्मा मेस्कर यांना ग्रामपंचायत सदस्य राजू उल्ले यांनी मारहाण केल्याची घटना गुरूवारी (ता. ३१) दुपारी साडेबारा वाजता दरम्यान घडली. यासंदर्भात दोन्ही पक्षांच्या तक्रारी दाखल झाल्या असून, पोलिसांकडून चौकशी सुरू आहे.ब्राह्मणवाडा थडी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील शासकीय जागेचा आठ राजू उल्ले यांनी त्यांच्या पत्नीच्या नावे तयार केला होता. याबाबत तहसील आणि एसडीओ कार्यालयात तक्रार दाखल झाली होती. तहसीलदार आणि एसडीओ यांनी सदर जागा शासकीय असल्याचा निकाल देत, ती महाराष्ट्र शासनाच्या नावे करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जागेचा आठ शासनाच्या नावे करण्यात आला. मात्र, राजू उल्ले यांनी ग्रामपंचायत सचिव प्रदीप देशमुख आणि कर्मचारी प्रशांत दारोकार, अतुल इंगोले, सचिन सावरकर यांच्या संगनमताने कोणताही ठराव किंवा फेरफार न करता पुन्हा जागेचा आठ आपल्या पत्नीच्या नावे करून घेतला.गुरुवारी ग्रामपंचायतीच्या सभेदरम्यान सरपंच पद्मा बस्कर यांनी या गैरव्यवहाराबाबत प्रोसिडिंग आणि रावाची मागणी केली. यावरून राजू उल्ले यांनी सरपंचांना ातिवादक शिवीगाळ करत अपमानित केले आणि रहाण केली. सरपंचांनी सांगितले की, ग्रामपंचायत र्यालयीन वेळेत मी सभेत उपस्थित असताना राजू उल्ले यांनी मला जातीवरून शिवीगाळ करत मारहाण केली.ब्राह्मणवाडा थडी ग्रामपंचायतीत राजकीय नेत्यांचे वाद नेहमीच चर्चेत असतात. यापूर्वीही अनेकदा राजकीय नेते आणि ग्रामपंचायत सदस्यांमध्ये शासकीय जागा आणि इतर मुद्यांवरून वाद झाले आहेत. या घटनेने गावातील राजकीय तणाव पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. ठाणेदार प्रशांत जाधव यांनी सांगितले, दोन्ही पक्षांच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. चौकशी पूर्ण झाल्यानंतर गुन्हे दाखल केले

# कोल्ह्याच्या हल्लयात वृद्ध शेतमजुर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१वरुड**



जरूड येथील एक वृद्ध शेतमजुर शेतातील विहीरीवर पाणी प्यायला गेला असता कोल्ह्याने अचानक हल्ला केला असता वृद्ध शेतमजुराने त्या कोल्ह्याच्या हल्याचा अर्धातास प्रतिकार करून आपला जिव वाचविल्याची घटना दुपारचे सुमारास घडली. दरम्यान शेतातील काही संत्रा व्यापाऱ्यांनी गंभीर जखमी शेतमजुराला रुग्णालयात दाखल केले असून वनविभागाने या घटनेचा पंचनामा करून त्या वृद्ध शेतमजुराला आर्थिक मदत करण्याची मागणी सोपान ढोले यांनी केली आहे. जरूड गावातीलआदिवासी शेतमजूर जोगीलाल धुर्वे (६२) हे बेनोडा (शहीद) – शेतशिवारातील मनोज रमेशराव वानखडे यांचे शेतात कामावर गेले होते. काम करीत असतांना दुपारचे सुमारास जोगीलाल धुर्वे हे शेतातील विहीरीवर पाणी प्यायला गेले असताकोल्ह्याने अचानक जोगीलाल धुर्वे यांचेवर हल्ला चढविला असता जोगीलाल धुर्वे यांनी सुद्धा कोल्ह्याच्या हल्याचा प्रतिकार करीत तब्बल अर्धातास झुंज दिली.

दरम्यान कोल्हा बेशुद्ध पडला तर शेतात उपस्थित संत्रा व्यापाऱ्यांनी धाव घेतली असता याहल्लूयात कोल्ह्याने जोगीलाल यांच्या शरीरावर अनेक ठिकाणी लचके तोडल्याने ते गंभीर जखमी झाले होते. यामुळे त्यांना तातडीने बेनोडा (शहीद) येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांचेवर उपचार करून आता ते धोक्याबाहेर असल्याचे सांगीतले. जोगीलाल धुर्वे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे त्यांना वनपरीक्षेत्र कार्यालयातर्फे तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी एका निवेदनाव्दारे जरूड येथील तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष सोपान ढोले यांनी केली आहे.-

# संचमान्यता अंतिम दिनांक संभ्रम दुर!

## ३० सप्टेंबरची पटसंख्या संच मान्यता साठी ग्रह धरले जाणार!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

राज्यातील सर्व शाळा ,विद्यार्थी व शिक्षकांची माहिती यु-डायस प्लस प्रणाली, सरल प्रणाली, मध्ये दिनांक३० सप्टेंबर २०२५ पर्यंत अद्यावत करून अंतिम करण्यात यावे असे आदेश संजय जाधव, प्रकल्प संचालक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी दिले आहेत. राज्यातील काही जिल्ह्यातील शिक्षण अधिकारी यांनी पत्र काढून ३१ जुलै २०२५ पर्यंत माहिती अद्यावत करणे संदर्भांत आदेशित केले होते. त्यामुळे राज्यातील सर्वच ?स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, शाळांमध्ये संभ्रम निर्माण झालेला होता त्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे वतीने शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना भेटून यासंदर्भात सर्व माहिती देऊन निवेदन देण्यात




आले होते माननीय शिक्षण मंत्री यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना आदेशित केले. तसेच सर्व माहिती अद्यावत करून अंतिम करणे बाबत केंद्र शासनाकडून ३० सप्टेंबर २०२५ अंतिम मुदत देण्यात आलेली आहेत. याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर सांगितले की, संचमान्यता२०२५-२०२६ च्या निर्धारण३० सितंबर २०२५ राहील. या वेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या आभार मानले आहेत.

### आदेश जारी, शिक्षण मंत्रीच्या आभार प्राथमिक शिक्षक समितीला यश

तसेच संच मान्ययता करतांना आधारवर न करता प्रत्यक्ष शाळेच्या पटावर आणि प्रत्यक्ष उपस्थित असणार्या विद्यार्थांच्यावर करण्यात यावी तसेच भेटी दरम्यान इतर मागणी पण करण्यात आल्या आहेत त्या सर्व मागण्यांच्या पाठपुरावा सुरू आहेत.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.-

# पोटे अभियांत्रिकीमध्ये विद्यार्थी फोरमची स्थापना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

पी. आर. पोटे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या फोरम स्थापनेचा सोहळा उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, प्रमुख पाहुणे म्हणून पी. आर. भावसार, विभागप्रमुख डॉ. यू. डब्ल्यू. होरे आणि. डॉ. एस. के. नंदा डीन स्टुडंट्स वेल्फेअर व मान्यवर मंचावर उपस्थित होते.




फोरम स्थापनेच्या या कार्यक्रमाचे संयोजन विभागातील फोरम समन्वयक प्रा.

एस. डी. टिंगणे यांनी केले होते. या कार्यक्रमात नव्याने निवडण्यात आलेल्या फोरमच्या सदस्यांची नावे जाहीर करण्यात आली. या फोरम अंतर्गत ईव्ही वर्कशॉप उद्घाटन सुद्धा या कार्यक्रमात संपन्न झाले. प्रमुख पाहुणे पी. आर. भावसार त्यांनी त्यांच्या सक्षम प्रोजेक्ट अंतर्गत महिलांना ऑटोमोटिव्ह उद्योगात टू-व्हीलर म्हणून टेक्निशियन प्रशिक्षण देण्यासाठी आयोजित वर्कशॉपबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. डॉ. पी. एम. जावंधिया यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी नेतृत्वगुण आत्मसात करावेत आणि तांत्रिक कौशल्यासोबतच सामाजिक जबाबदारीही पार पाडावी, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कोमल चव्हाण आणि आभार प्रदर्शन विद्यार्थिनी तन्वी पवार हिने केले

# खामगाव ते शेगाव 'गण गण गणात बोते'चा जयघोष

## गजानन महाराज पालखी सोहळ्यात भक्तांची अलोट श्रद्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१खामगाव-** आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी गेलेल्या संत गजानन महाराजांच्या पालखीचा परतीचा प्रवास आज संपला. या दरम्यान खामगाव शहरातून मोठ्या संख्येने भाविक शेगावपर्यंत सहभागी झाले होते. खामगाव ते शेगाव या मार्गात 'गण गण गणात बोते'चा गजर करत भक्तांचा शब्दश: सागर उसळला होता. भक्ती रसाचे अद्भुत दृष्य पाहण्यासाठी भाविकांनी देखील मोठी गर्दी केली होती.श्रींच्या पालखीचे गुरुवारी पहाटे ५ वाजता खामगाव येथून शेगावकडे प्रस्थान झाले. श्री क्षेत्र पंढरपूर पायी वारी श्रींचा पालखी सोहळ्याचे हे ५६ वे वर्ष असून २ जून रोजी



प्रस्थान केलेल्या पालखीचा ३० जुलै खामगाव येथील शेवटचा मुक्काम होता.गुरुवार ३१ जुलै रोजी पहाटे ५ वाजता श्रींची पालखी अग्रसेन चौक, कमान गेट, शहर पोलिस स्टेशन, आयकर भवन, बस स्टॅन्ड, सामान्य रुग्णालय समोरून शेगावकडे प्रस्थान केले. शेगाव येथे सायंकाळी या पालखी सोहळ्याचे विसर्जन झाले. खामगाव ते शेगाव या पायी वारीत हजारो भाविक सहभागी झाले होते.आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी गेलेल्या संत गजानन महाराजांच्या पालखीचे बुधवारी खामगाव शहरात भाविकांच्या वतीने हर्षोल्हसात स्वागत झाले. २ जून रोजी प्रस्थान झालेल्या या पालखी सोहळ्यात ७०० वारकरी सहभागी झाले होते. ३३ दिवसांची ही पायी वारी करून सुमारे ७५० किलोमीटरचा प्रवास करत वारकरी परतले आहेत. श्रींच्या दर्शनासाठी शहरात भाविकांची गर्दी दिवसभर होती ३१ जुलै रोजी पहाटे ५ वाजता श्रींच्या पालखीचे शेगावकडे प्रस्थान झाले होते.

# पोलिसांच्या अंगावर कार चढविण्याचा प्रयत्न; माजी आमदारपुत्राविरुद्ध गुन्हा

## राजकुमार पटेलांसह ४०० जणांविरुद्ध फौजदारी : मृतदेहाची अवहेलना केल्याप्रकरणी गंभीर गुन्हे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मेळघाट**

कर्तव्यावरील पोलिसांच्या अंगावर कार घालण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी माजी आमदारपुत्र तथा धारणी बाजार समितीचे सभापती रोहित राजकुमार पटेल याच्याविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला. चिखलदरा पोलिसांनी गुरुवारी दुपारी माजी आमदार राजकुमार पटेल, मन्ना दारसिंबे, सुनील उईके, रघुवीर सतवासे, गणेश बेठेकर, देवीदास कोगे व त्यांच्या ३०० ते ४०० सहकाऱ्यांविरुद्ध बेकायदेशीररीत्या रास्ता रोको, सार्वजनिक वाहतूक



अडवणे व मृतदेहाची अवहेलना केल्याप्रकरणी गंभीर गुन्हे दाखल केलेत.

चिखलदरा तालुक्यातील नागापूरस्थित वसंतराव नाईक आदिवासी आश्रमशाळा येथे २९ जुलै रोजी पाण्याच्या टाकीची भिंत अंगावर पडल्यामुळे त्या शाळेतील १४ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला. ३० जुलै रोजी त्या मुलीच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर पार्थिव मुलीच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

प्रेत अंत्यसंस्कारासाठी मुलीच्या मूळ गावी गांगरखेडा येथे न नेता ते धारणी प्रकल्प अधिकारी कार्यालयात नेऊन मृत मुलीच्या परिवारास जोपर्यंत ५० लाख रुपयांची आर्थिक मदत मिळत नाही, तोपर्यंत तिचे प्रेत प्रकल्प अधिकारी कार्यालयातच ठेवून आंदोलन करणार, अशी भूमिका माजी आमदार राजकुमार पटेल व त्यांचा मुलगा रोहित यांनी घेतली.

**पोलिसांशी हुज्जत**

बुधवारी राजकुमार पटेल, रोहित पटेल व इतरांनी घटांग टी-पॉइंट येथे विनापरवानगी सार्वजनिक रस्ता अडवून मुलीचे प्रेत रस्त्यावर ठेवले. प्रकल्प अधिकारी कार्यालयात जाऊ द्या; अन्यथा आम्ही प्रेत घेऊन इथेच बसतो, असे म्हणत पोलिसांशी हुज्जत घातली. रास्तारोको केला.थोड्या वेळाने राजकुमार पटेल हे त्यांच्या सहकाऱ्यांसह मुलीचे प्रेत हातात घेऊन धारणी रोडने धावत निघाले. ते प्रेत रोहित पटेल चालवत असलेल्या वाहनात ठेवले तथा धारणीच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला.

**रोहित पटेलला अटक**

एफआयआरनुसार, रोहित पटेल याने त्याची कार जीव घेण्याच्या उद्देशाने पोलिसांच्या अंगावर चढविण्याचा प्रयत्न केला. ते वाहन पुढे रोरा फाट्याजवळ पोलिसांनी थांबविले. त्यानंतर पोलिसांनी राजकुमार पटेल व रोहित पटेल यांना ताब्यात घेऊन त्यांना चिखलदरा ठाण्यात आणले. गुरुवारी गंगारखेडा येथे त्या मुलीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, गुरुवारी दुपारी गुन्हा दाखल केल्यानंतर रोहित पटेल याला गुन्ह्यात अटक करण्यात आली. त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. तर राजकुमार पटेल यांना रुग्णालयात हलविण्यात आले.

# गणपती व महालक्ष्मी साठी गावाकडे जायचंय? पण रेल्वे आरक्षण फुल्ल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

राज्यातील सर्वात मोठा उत्सव गणेशोत्सवासाठी मध्य रेल्वेने मुंबई, कोकण परिसरासाठी मोठ्या प्रमाणात विशेष रेल्वे गाड्यांची सोय केली असली तरी अमरावती जिल्ह्यातील प्रवाशांसाठी मात्र अद्याप अशी कोणतीही सोय करण्यात आली नाही. त्यामुळे आतापासूनच गणेशोत्सव तसेच महालक्ष्मी पूजनाच्या कालावधीसाठी अमरावती, बडनेराहून मुंबई, पुणे, अहमदाबादकडून येणाऱ्या व जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्यांचे आरक्षण फुल्ल झाले आहे.



२७ ऑगस्टपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे. गणेशोत्सवाच्या आधी दोन ते तीन दिवसांचे तसेच गणेशोत्सवादरमान व गणेशोत्सवा नंतरचे तीन ते चार दिवस आरक्षण मिळेनासे झाले आहे. या कालावधीत मुंबई, पुणे, अहमदाबादसह इतर मोठ्या शहरांमध्ये राहणारे चाकरमाने, शिकणारे विद्यार्थी, तसेच संपूर्ण कुटुंबच गृहनगरात येऊन हा उत्सव आप्त, मित्रांसह साजरा करत असतात. गणेशोत्सव आटोपला की, पुन्हा कर्तव्यस्थळी परत जातात. त्यामुळे आतापासूनच गणेशोत्सव तसेच महालक्ष्मी पूजनाच्या कालावधीत अमरावती-सीएसएमटी अंबा एक्स्प्रेस, अमरावती-पुणे एक्स्प्रेस, अमरावती-जबलपूर, अमरावती-पुणे (रात्री १०.५०), गीतांजली, गरीबरथ, नागपूर-पुणे, विदर्भ, महाराष्ट्र, ज्ञानेश्वरी या सुपरफास्ट रेल्वे गाड्यांचे आरक्षण फुल्ल असल्यामुळे प्रवासी विशेष रेल्वेची घोषणा केव्हा होते याचीच वाट बघत आहे. काहींनी पर्याय म्हणून ट्रॅव्हल्सच्या तिकिटाचे नियोजन केले असून ज्यांच्याकडे स्वत:ची वाहने आहेत, ते नाईलाजाने त्यांच्या वाहनाने गृहनगरात येणार आहेत.

थेट अमरावतीला येणे जमत नसेल तर बडनेरा येथे उतरून अमरावतीला येणेही फारसे अवघड नाही. त्यामुळे मुंबई, पुण्याहून नागपूरला जाणाऱ्या बहुतेक सर्वच सुपरफास्ट रेल्वे गाड्यांचे आरक्षण मिळेनासे झाले असून हीच स्थिती परतीच्या आरक्षणाची आहे. कारण, बहुतेकांनी दीड ते दोन महिने आधीच आरक्षण करून ठेवले आहे. त्यामुळे ज्यांनी ऐनवेळी गृहनगरात येण्याचा निर्णय घेतला त्यांना मात्र, रेल्वेच्या आरक्षणासाठी प्रतिक्षा करावी लागत आहे.

# मोर्शीत मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचा कार्यारंभ : रविवारला मुख्यमंत्री फडणवीस करणार उद्घाटन, अनेक विकासकामांचाही शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ३ ऑगस्टला अमरावती जिल्ह्यात येणार आहेत. महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठातर्फे (माफसू) मोर्शी येथे पदवी महाविद्यालय सुरू केले जात आहे. या महाविद्यालयाच्या इमारतीचा कार्यारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.



हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रस्तावित जागेवर बसस्थानकामागील अप्पर वर्धा वसाहतीत दुपारी ३ वाजता आयोजित केला आहे. राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी या महाविद्यालयासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.कार्यक्रमाला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन उपस्थित राहणार आहेत. तसेच दुग्धविकास मंत्री अतुल सावे, मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे आणि आमदार उमेश यावलकर हेही उपस्थित असतील.

याच कार्यक्रमात मोर्शी नगरपालिकेच्या नवीन इमारतीचे लोकार्पण करण्यात येणार आहे. शासनाच्या विविध विभागांच्या कार्यक्रमांचा शुभारंभही होईल. दिव्यांग बांधवांना साहित्य वितरण आणि जिल्हा परिषद शाळांमधील डिजिटल क्लासरुमचा शुभारंभही यावेळी होणार आहे.पाच एकर जागेवरील अहिल्या वट वनाचे भूमिपूजन आणि खासदार डॉ. बोंडे यांच्या निधीतील विकासकामांचा शुभारंभही या कार्यक्रमात समाविष्ट आहे. सर्व कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने होतील.कार्यक्रम संपल्यानंतर मुख्यमंत्री अमरावतीकडे प्रयाण करून तेथील काही स्थानिक कार्यक्रमांना उपस्थित राहतील. आयोजकांनी सर्व संबंधितांना कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# शिक्षकांच्या बदलीत अँजिओप्लास्टीचा आधार जिल्हापरिषदेकडे चौकशीसाठी आले पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अचलपूर जिल्हापरिषद शिक्षकांची जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया सन-२०२५ मध्ये बदला प्रक्रियेमध्ये अँजिओप्लास्टीचा संवर्ग १ मध्ये लाभ घेणाऱ्या शिक्षकांची नावे राज्य शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयाने मागितले आहे. त्या अनुषंगाने कक्ष अधिकारी ज्योत्स्ना अर्जुन यांच्या स्वाक्षरीचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद अमरावती यांना २० जुलै रोजी प्राप्त झाले आहे.

पत्रामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, या विभागाच्या शासन निर्णय १८ जून २०२४ मधील तरतुदीनुसार सद्य:स्थितीत जिल्हापरिषद शिक्षकांची जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया सन-२०२५ बाबतची कार्यवाही ऑनलाईन पोर्टलद्वारे सुरु आहे.

उपरोक्त तद्नुषंगाने १८ जून२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विशेष संवर्ग शिक्षक भाग-१ अंतर्गत अँजिओप्लास्टी झालेल्या शिक्षकांना लाभ अनुज्ञेय करण्यात आला असल्यास, याबाबतची माहिती तत्काळ उलटटपाली शासनास करावयाची आहे. सदर माहिती न्यायालयीन प्रकरणी उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी आवश्यक असल्यामुळे प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात यावी, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.




अचलपूर तालुक्यासह अन्य तालुक्यातही अँजिओप्लास्टीचा लाभ संवर्ग-१ अंतर्गत बदलीकरिता मोठ्या प्रमाणात घेतला आहे. या संवर्गामध्ये अशी तरतूद आहे की, खरोखर आजारी असलेल्या शिक्षकांची सुश्रुषा करता यावी, यासाठी शिक्षिका पत्नीलाही लाभ दिला जातो. अँजिओप्लास्टी झालेल्या शिक्षकांसोबतच त्यांच्या पत्नीनेही त्याच वेळी लाभघेतल्याची खात्रीलायक माहिती आहे. शासनाच्या डोळ्यात धूळफेक करून शासनाच्या बदली प्रक्रियेला खिंडार पाडले.

संवर्ग- १ यामध्ये जे शिक्षक गंभीर आजारी आहे. अशा शिक्षकांना बदली प्रक्रियेचा लाभघेता येतो. म्हणजे त्यांना आरोग्याची काळजी घेण्यासाठी त्यांच्या सोयीच्या ठिकाणी बदली घेण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा शिक्षकांची पत्नी जर शिक्षिका असेल, तर शिक्षिका पत्नीलासुद्धा पतीची सुश्रुषा करण्यासाठी लाभ दिला जातो संवर्ग-१ या शासन निर्णयातील तरतुदींचा दुधारी शस्त्रासारखा अनेक शिक्षकांनी लाभ घेतला आहे. काही शिक्षकांचे प्रमाणपत्र सुद्धा बनावट असल्याचा संशय आहे, तर काही शिक्षकांजवळ केवळ नावापुरते सर्टिफिकेट्स आहे. या सर्टिफिकेटच्याबदली प्रक्रियेमध्ये मागील काही भरवश्यावर सदरः शिक्षकांना वर्षापासून सातत्याने लाभ मिळत आहे.

**बदली प्रक्रिया विस्कळीत**

बदल्या या पारदर्शक व्हाव्या, यासाठी शासन-प्रशासन नेहमी सतर्क असते. बदलीपात्र शिक्षकांना बदलीतून कुठलीच सूट नाहीः मात्र काही शिक्षकानी बदली प्रक्रियेतून स्वतःला वाचविण्यासाठी आपल्या आर्थिक वजनाचा वापर करून बदलीचा लाभ घेतला आहेः मात्र यामुळे सदर बदली प्रक्रिया पारदर्शक होण्याऐवजी विस्कळीत झाली आहे.अँजिओप्लास्टी ही हृदय शस्त्रक्रिया नाहीच आहे. त्यामध्ये हृदय शस्त्रक्रिया हा शब्दप्रयोग नमूद आहे. हृदय शासनाच्या आदेशामध्ये गंभीर आजाराची व्याख्या करण्यात आली शस्त्रक्रिया ही अतिशय जोखमीची तेवढीच दीर्घकाळ आरामाची असते, तर अँजिओप्लास्टी ही काही तासातच करून रुग्णांना लवकरच सुट्टी मिळते. असे रुग्ण चालते-बोलते असतात, शिवाय शल्य चिकित्सक हेच 'हृदय शस्त्रक्रिया करू शकतात, तर अँजिओप्लास्टीचे वेगळे

# पोरगव्हाण-धामणगाव रस्त्यावरील पूल खचला; अपघाताच्या दारात वाहतूक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील पोरगव्हाण ते धामणगाव रस्त्यावरील पूल गेल्या काही दिवसांपासून खचलेल्या अवस्थेत असून तो अपघाताला निमंत्रण देत आहे. या पुलाच्या दुरवस्थेमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.



गेल्या वर्षी विष्णोरा येथील हरिदास लोखंडे हे दुचाकीस्वार याच पुलावरून जाताना वाहून गेले होते. सुदैवाने त्यांचे प्राण वाचले, मात्र त्यानंतरही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही, ही बाब अंगवळणी लागलेली असताना आता मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या रस्त्यावरून दररोज अमरावती ते विष्णोरा बससेवा सुरू असते. त्यामुळे वाहनचालकांसह प्रवाशांना देखील त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहने चालवणे धोकादायक ठरत आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याकरिता जीव धोक्यात घालावा लागत आहे.गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अजून काही पाऊस झाला तर पोरगव्हाण आणि धामणगाव यांच्यातील संपर्क तुटण्याची शक्यता आहे. आजूबाजूच्या गावांनाही याचा फटका बसत असून प्रशासनाने तातडीने लक्ष घालून पूल दुरुस्त करावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

# उद्याला अमरावती जिल्ह्यातील निम्मी पोस्ट ऑफिसेस राहणार बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील निम्म्या भागात शनिवारी, २ ऑगस्ट रोजी पोस्ट ऑफिसेस बंद राहणार आहेत. नवीन ॲडव्हान्स्ड पोस्टल टेक्नॉलॉजी (एपीटी) इन्स्टॉल करण्यासाठी ही आपत्कालीन सुटी घेण्यात आली आहे.

अचलपूर, दर्यापूर, अंजनगाव, चांदूरबाजार आणि मेळघाटमधील धारणी व चिखलदरा तालुक्यातील सर्व पोस्ट ऑफिसेस बंद राहतील. रक्षाबंधनाची धामधूम सुरू असताना ही सुटी जाहीर झाल्याने




बहिणींना राख्या पाठविण्यासाठी अडचणी निर्माण होणार आहेत. शनिवारनंतर रविवारची नियमित सुटी असल्याने नागरिकांना सलग दोन दिवस या सेवेपासून वंचित रहावे लागणार आहे.

टपाल खात्याने देशभरात ॲडव्हान्स्ड पोस्टल टेक्नॉलॉजी (एपीटी) ही प्रणाली टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्याचे ठरवले आहे. अमरावती विभागातील अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर, तिवसा, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, मोर्शी आणि वरुड या तालुक्यांमध्ये २२ जुलैला ही प्रणाली इन्स्टॉल करण्यात आली आहे.

अमरावती जिल्ह्यात एकूण ४१४ शाखा कार्यालये, ५३ उप डाकघर आणि अमरावती व परतवाडा येथे दोन मुख्य डाकघरे आहेत. यापैकी अमरावतीचे मुख्य डाकघर, ३३ उपडाकघर आणि २३६ शाखा कार्यालयांमध्ये ही प्रणाली आधीच इन्स्टॉल झाली आहे. परतवाडा विभागाशी संबंधित उर्वरित १९७ कार्यालयांमध्ये ती २ ऑगस्ट रोजी इन्स्टॉल केली जाईल.

उप डाक अधीक्षक पांडुरंग गेडाम यांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. शनिवारी बंद राहणाऱ्या कार्यालयांमध्ये परतवाडा येथील एक मुख्य डाकघर, २० उपडाकघरे आणि १७८ शाखा कार्यालयांचा समावेश आहे. रजिस्टर पोस्ट, स्पीड पोस्ट, मनी ऑर्डर, बचत खाते, विमा, पारपत्र, आधार अपडेशन यांसारख्या सर्व सेवा या दिवशी उपलब्ध होणार नाहीत.

# प्रत्येकाने पर्यावरणाचा दूत म्हणून कार्य करावे - जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे आवाहन

## नांदगाव पेठ औद्योगिक परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पर्यावरण स्नेही विचारांचा आदर्श ठेवत प्रत्येकाने पर्यावरण रक्षणाचे व्रत स्वीकारावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले. विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचा दूत बनून पुढाकार घ्यावा, असेही ते म्हणाले.

नांदगाव पेठ येथील औद्योगिक वसाहतीत वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार राजेश वानखडे, माहुलीच्या सरपंच प्रीती बुंदिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, प्रादेशिक अधिकारी राम लंके, वन अधिकारी दर्शना पाटील, कृषी अधिक्षक राहुल सातपुते, सहायक वनसंरक्षक पुष्पलता बोंडे, गटविकास अधिकारी श्री. सुपे आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले की, सध्या हवामान बदलाचे परिणाम प्रत्येक नागरिक अनुभवत आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज बनली आहे. राज्य



शासनाने हाती घेतलेल्या 'हरित महाराष्ट्र' मोहिमेस नागरिकांनी पाठिंबा द्यावा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'एक पेड़ माँ के नाम' हा उपक्रम सुरू केला असून, प्रत्येकाने एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार वानखडे यांनी सांगितले की, आपल्या आईच्या स्मरणार्थ झाड लावण्याचा संकल्प करून नागरिकांनी पर्यावरण संवर्धनात योगदान द्यावे. फक्त झाडे लावल्याने नव्हे तर ती जगविल्यास निसर्गाचे संतुलन राखले जाईल, असे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात एक लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. वृक्षपूजनानंतर मान्यवरांनी आणि विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले.

या उपक्रमात भारतीय महाविद्यालय, दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, प्रा. राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, तक्षशिला महाविद्यालय, तसेच एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी सहभागी झाले.

महसूल विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, कृषी विभाग, अमरावती महापालिका आणि रास्तभाव दुकानदार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.सूत्रसंचालन निरीक्षण अधिकारी चैताली यादव यांनी केले, तर आभार अनिल भटकर यांनी मानले.